# राशन दुकानचा तांदूळ काळ्या बाजारात विक्रीसाठी नेताना दोन ट्रकसह ३७ लाख ५० हजार रूपयांचा ऐवज जप्त

## अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या पथकाची कारवाई



**अर्धापूर–** तालुक्यातील सत्य गणपती मंदिराच्या कमानी जवळ चौधरी हॉटेल जवळ दि.११ सोमवार रोजी सायंकाळी ५-३० वा. दोन ट्रकमध्ये राशनचा माल असल्याची माहिती गुप्त खबऱ्यामार्फत अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या पथकाला मिळताच त्यांनी ट्रकमधील मालाची पाहणी केली असता तांदुळ आढळून आला. या प्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात ट्रक चालक व तांदूळ मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून राशनच्या मालाची काळ्या बाजारात विक्री होत असल्याची चर्चा सुरू होती. राशनचा माल दोन ट्रक मध्ये भरलेल्या असल्याची माहिती गुप्त खबरा मार्फत अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार ट्रक क्रमांक (जी.जे.२५ यु.८०९७), (जी. जे. ३६.व्ही.२९७९) यामध्ये पांढऱ्या रंगाच्या नायलॉन पोत्याम ध्ये राशन दुकान चा तांदूळ २७ टन तांदूळ किंमत १२ लाख रुपये एकुण मुद्देमाल किंमत ३७ लाख ५९ हजार रुपये किंमतीचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील तांदूळ शासकीय परवाना नसताना बेकायदेशीररित्या काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेला मिळाल्या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक कपील आगलावे यांच्या फिर्यादीवरून आरोपी हिराभाई रामाभाई सिंधल (रा.राणावाव ता.रानावाव जि.पोरबंदर),भरत चन्नाभाई ओडेकर चालक (रा.देवडा ता.कुतीयला जि.पोरबंदर) तांदुळ मालक दोघ-जण यांच्या विरूद्ध कलम ३,७ अत्यावश्यक वस्तु अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक अशोक जाधव, मदत पोलीस नाईक राजेश घुन्नर हे करीत आहेत.

प्रजावाणी दि. 13/07/2022

महत्वाची बैठक पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईत मातोश्री येथे आयोजित केली होती. बैठकीला प्रारंभ झाल्यानंतर तेथे खा. हेमंत पाटील यांची अनुपस्थिती दिसून आली. यानंतर विविध माध्यमांमध्ये त्यांच्याबद्दल उलट-सुलट बातम्या प्रसारित झाल्या. वास्तविक हेमंत पाटील यांनी रविवारी नांदेड शहरात आषाढी महोत्सवाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम रात्री उशीरापर्यंत चालला. त्यामुळे मातोश्रीवर बोलविल्या बैठकीस पोहचण्यास काहीसा विलंब झाल्याचे सांगून राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसंदर्भात पक्षप्रमुख जे निर्णय घेतील तो मला मान्य राहिल, असे खा. हेमंत पाटील यांनी स्पष्ट केले.

प्रजावाणी 12/07/2022

# पोलीस ठाण्यावर दगडफेक; २७ जणांना पाच वर्षे सक्तमजुरी

नांदेड, दि. ११ : भीमा कोरेगाव येथे झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर तामसा शहर बंद ठेवण्याची हाक दिल्यानंतर ठाण्यात निवेदन देण्यासाठी गेलेल्या जमावाने पोलीस ठाण्यावर दगडफेक करून गोंधळ घातल्याप्रकरणी येथील न्यायाधिश एस.के. बांगर यांनी २७ जणांना पाच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली. दरम्यान, सदर गुन्ह्यातील एक आरोपी फरार आहे.

अलिकडच्या दहा वर्षांत एकाच वेळी आणि ३५३ च्या कलमाखाली २७ जणांना शिक्षा सुनावण्याची ही पहिलीच वेळ मानली जात आहे. पाच वर्षांच्या शिक्षेसोबत आरोपींना प्रत्येकी २१ हजार रूपयांचा दंड लावण्यात आला आहे. या दंडाची एकूण रक्कम ४ लाख एवढी आहे. वेगवेगळ्या कलमाखाली सुनावण्यात आलेल्या शिक्षा आरोपींना

पान २ वर

मा. लि. पान १२

आषाढरंगी अ
लेखणीच्या भाव
उन्नत राहो अभिमा
शुभेच्छांच्या
आद
वाढ

Singh Advt. 9822242222